MHSO110018802024

**नियमित दिवाणी दावा क्र. ६६७/२०२४**
(राहुल सावंत वि. बाजीराव सावंत व इतर)

**<u>निशाणी क्र. २८ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीने दावा दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ आण्णा कृष्णा सावंत हे दि. २२/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयताचे वारस यातील दावा जमिन गट नं. १७२ चे ७/१२ उता–यावर राणी पोपट सावंत यांचे नाव नमुद आहे. त्यामुळे सदर मयताचे वारस या दाव्यात समाविष्ठ करणे आवश्यक आहे. म्हणुन सदरचा दावा दुरुस्त करुन त्यामध्ये प्रतिवादी नं. २ आण्णा कृष्णा सावंत या नावास कंस करुन त्यापुढे मयत असे लिहुन त्यानंतर प्रतिवादी नं. २ म्हणुन राणी पोपट सावंत, उ.व.२८, धंदा– शेती, रा. दहिगाव, ता. माळशिरस, जि. सोलापुर हे नाव दाखल करण्यास व तशी दाव्यात अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादीने सदर दुरुस्तीस म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे अर्ज विना म्हणणे चालविण्यात येतो. अर्ज व अभिलेख वाचून पाहिला. वादी वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

४. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादीने अर्जातील केलेली विनंतीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये व मागणीमध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने दाव्याच्या सरनाम्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती दाव्यात करावी व दाव्याची दुरुस्त प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी.

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.04.15 18:49:30 +0530

**(गुलफराज एम. बिरादार)**

दिनांक – १५.०४.२०२६

३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माळशिरस